महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. 9004 दि.- २३/५/२३

## अपिलाची सुनावणी

(अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.)

दिनांक – १६ /०५/२०२३ दिनांक – सकाळी ११.०० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

| | |
|---|---|
| प्रति,<br>**श्री पंकज उणेचा<br>मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर<br>पुणे – ४११००५** | अपिलार्थी |
| श्री. राजेश फटाले<br>महापालिका सहाय्यक आयुक्त<br>बिबवेवाडी कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका. | जनमाहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता |

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री. पंकज उणेचा यांचा माहिती अधिकारातील दिनांक (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) २१/०४ /२०२३रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका आ. क्र. ५२१, दि २१/०४ /२०२३ यांना दिनांक ( यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) रोजी प्राप्त झाला.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| २०/०३/२०२३ | २०/०३/२०२३ | १९/०४/२०२३ | - | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती देण्यात आलेली माहिती अपीलार्थी यांना समाधान नसल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक २१/०४/२०२३रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्तझाला

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| २१/०४/२०२३ | २१/०४/२०२३ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.१६ /०५ /२०२३रोजी सकाळी ११.००वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -

| अ.क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | स्वारगेट येथील लक्ष्मिनारायण चौका मधील सुयोग गार्डन समोरील कृष्ण कुंज सोसायटी येथे सुरु असलेल्या पाईप लाईन टाकण्याच्या कामाबद्दल संपूर्ण माहिती. | मुद्दा क्र १ हा बिबवेवाडी कार्यालशी संबधित असून आपण विचारलेल्या माहितीच्या अनुषंगाने आमचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेले अभिलेख आपणास अवलोकनार्थ पूर्वनियोजित कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून आपणास हवा असलेल्या अभलेखाच्या झेरोक्स प्रती २ रु प्रमाणे शुल्क मनपा कोषगरात भरून त्याची पावती सादर केल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल |
| २ | सरसेनापती हंबीरराव शिळीमकर शाळा येथे रीलॅक्स पावभाजी समोर सुरु असलेल्या पाईप लाईन टाकण्याच्या कामाबद्दल संपूर्ण माहिती. | मुद्दा क्र २ हा पथ विभागाशी संबधित असल्याने प्रस्तुत अर्ज पथ विभागाकडे वर्ग करीत आहोत . तरी सादर माहिती अर्जदारास परस्पर उपलब्ध करून यावी हि विनंती. |
| ३ | सन २०१७ ते २०२३ या दरम्यान उद्यान विभांग मार्फत वृक्ष तोडी संदर्भात देण्यात आलेल्या परवानगी तसेच परवानगी पत्रातील वृक्ष पुनररोपण संदर्भातील संपूर्ण माहिती (परवानगी पत्रातील पुनर रोपण केलेल्या वृक्षाच्या जाती, पुनर रोपणाची जागा देखभाल अहवाल. | आपण विचारणा केलेली सन २०१७ ते २०२३ या कालावधी मधील माहिती हि विस्तुत व व्यापक स्वरुपाची असल्याने आपण बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय येथे उपस्थित राहून कागदपत्राची पाहणी करावी व आपणास आवश्यक असलेली माहिती सशुल्क उपलब्ध करून देण्यात येईल. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक १६ /०५/२०२३रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.पंकज उणेचा हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.राजेश फाटले जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच श्री अजय खामकर ततकालीन सहा.जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री पंकज उणेचा यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जात विचारलेली माहिती व देण्यात आलेली माहिती अपीलार्थी यांना समाधानकारक नसल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केला असल्याचे नमूद केले आहे. वरीलप्रमाणे उपस्थित जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अधिकार अर्जाची माहिती उपलब्ध करून देणेत आली तथापि सदरची माहिती अपिलार्थी यांना समाधानकारक नसल्याचे नमूद केले आहे. समाधान नसल्यानेनमूद केलेले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारीयांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश'</u>**

अर्जदार यांनी विचारलेल्या माहिती अधिकार अंतर्गत पुढील प्रमाणे पारित आदेश. मुद्दा क्र. २ प्रमाणे अपिलार्थी यांनी अपील सुनावणी दरम्यान मागितलेल्या माहितीची प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पहाणी केली असता सदर काम बिबवेवाडी कार्यालया अंतर्गत झाल्याचे दिसून येते. सदर अपिलार्थी यांनी विचारलेली माहितीचा शोध घेऊन उपलब्ध माहिती व त्या संदर्भात कागदपत्रे अपिलार्थी यांस विनामुल्य आठ दिवसाच्या आत देण्यात यावी.

(प्रकाश पवार )
अपिलीय अधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्याल
पुणे महानगपालिका

Kothmire bibawewadi letter

टिप –

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.orgया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. श्री .राजेश फटाले ,जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता , बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
२. श्री अजय खामकर तत्कालीन सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
३. श्री शुभम बाबर विद्यमान सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका